# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# ज्याच्याकडे कौशल्य आहे त्याच्याकडे संधी आपोआप येतील : संजीव चव्हाण



मार्गदर्शन करताना संजीव चव्हाण.

▲पाटण, दि. २४ : आजचा काळात पदवीसोबत तुमच्याजवळ कौशल्य असणे गरजेचे झाले आहे. कौशल्य आपल्या हातात असणे अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षण तुम्हाला उभे करते, पण कौशल्य तुम्हाला पुढे नेते, असे प्रतिपादन कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी केले.

पाटण येथील इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट येथे उज्ज्वल भविष्य आणि कौशल्य विकास या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी प्राचार्य चेतन सावंत, प्रा. भारत कांबळे, प्रा. अमोल चव्हाण, प्रा. समीर संकपाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

संजीव चव्हाण म्हणाले, आज जग झपाट्याने बदलत आहे. नवीन तंत्रज्ञान, नवीन संधी आणि नवीन आव्हाने आपल्यासमोर उभी आहेत. त्यामुळे जो नवनवीन कौशल्य आत्मसात करेल तोच यशाच्या शिखरावर पोहोचेल. त्यामुळे ज्याच्याकडे कौशल्य आहे त्याच्याकडे संधी आपोआप येतील. आजच्या युवकांनी केवळ नोकरी मागणारे न बनता नोकरी देणारे बनण्याचा विचार केला पाहिजे. उद्योजकता, नवीन कल्पना आणि कौशल्य यांच्या जोरावर आपण स्वतःचं आणि देशाचं भविष्य घडवू शकतो. आजच्या युवकांनी केवळ नोकरी मागणारे न बनता, नोकरी देणारे बनण्याचा विचार केला पाहिजे. उद्योजकता, नवीन कल्पना आणि कौशल्य यांच्या जोरावर आपण स्वतःचं आणि देशाचं भविष्य घडवू शकतो. आपल्या प्रत्येकामध्ये एक वेगळे कौशल्य आहे त्याला ताकद बनवा.

प्राचार्य चेतन सावंत यांनी प्रास्ताविक केले. प्रा. समीर संकपाळ यांनी आभार मानले. कार्यशाळेस कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटणच्या संस्थेतील शिक्षक उपस्थित होते.